# Cosmos Multidisciplinary Research E-Journal

Recognized International Peer Reviewed Journal

ISSN 2456-1665

VOLUME II | ISSUE I | JAN - FEB - MARCH 2017



**Dr. Tukaram Gajar**
Executive Editor & Publisher

**Prof. Dr. Gajhans D.S.**
Chief Editor

Online Available at www.cmrj.in
ISSN No. 2456-1665

# INDEX


| Sr. No. | Title of article | Author / Researcher | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | Effect of Gender on Self Confidence and Self-Concept Among College Going Students | Mr. Jige D. P. | 1-4 |
| 2 | ڈپٹی نذیر احمد کی ناول نگاری: ابن الوقت کے حوالے سے | شیخ عبدالمجید عبدالحمید (بیڑ) | 5-7 |
| 3 | मराठवाड्याच्या जलसिंचनातील विषमता : एक विश्लेषण | प्रा. डी. के. घडलिंग<br>प्रा. डॉ. जी. बी. गावडे | 8- 12 |
| 4 | Causes of Drought in Maharashtra | Mr. Sandip Dhakne | 13-16 |
| 5 | "Effect of Gender on Self Esteem and Self Concept among Interschool Players" | Suresh Patil | 17-20 |
| 6 | DESCRIPTION OF FREE LIVING MARINE CILIATE Aspidisca aculeata FROM GUHAGAR BEACH, RATNAGIRI (M.S.). | V.D. Bandar<br>S.V. Nikam | 21-25 |
| 7 | A Geographical Study of Performance of Sugar Factories in Jalna District (MS) | Dr. A. I. Khan<br>Mr. Pathan M.F. | 26-30 |
| 8 | A Study of Correlation between Agriculture Sector and Indian Economy | Dr. R. B. Sangule | 31-34 |
| 9 | A study of Locus of control and marital adjustment among school teacher in Parbhani and Aurangabad (MS) | Dr.Raypure S.E<br>Surwase Y.V. | 35-41 |
| 10 | वीटभट्टी व्यवसायातील असंघटित कामगारांच्या समस्या आणि परिणाम | खरात प्रकाश विनायकराव | 42-45 |
| 11 | जलनायक - शंकरराव चव्हाण | ज्ञानदेव शिवनाथ नागवे | 46-48 |
| 12 | मानवी हक्क आणि संविधान | डॉ. अंकुशराव अंबादासराव चव्हाण | 49-51 |
| 13 | भारतातील सार्वजानिक आरोग्य सेवा-सुविधांचा अभ्यास | गायकवाड पी.बी. | 52-57 |

Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Recognized International Peer Reviewed Journal
Online Available at www.cmrj.in
ISSN No. 2456-1665

# जलनायक - शंकरराव चव्हाण

**श्री. ज्ञानदेव शिवनाथ नागवे**
संशोधक विद्यार्थी,[इतिहास विभाग]
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

भारताच्या राजकारणातील हिमालयासारखे उत्तुंग आणि निष्कलंक असलेले व्यक्तीमत्व म्हणजे शंकरराव चव्हाण. रान पेटविणे ही जशी क्रांती असते,तशीच रान भिजविणे ही सुध्दा एक क्रांतीच असते. हा उद्देश ठेवून भगीरथ प्रयत्नाने जिवाचे रान करुन पाटबंधारे प्रकल्प उभारुन जलसिंचनाची शीतल क्रांती करणारे शंकरराव चव्हाण हे एक जलनायक ठरतात.

**उद्देश:-** १) शंकरराव चव्हाण यांच्या जलसिंचन विषयक विचारांचा अभ्यास करणे.

२) शंकरराव चव्हाण यांच्या जलसिंचन विषयक कार्याचा अभ्यास करणे.

राजकारण व समाजकार्य करताना सत्ता, पद, प्रतिष्ठा, मानसन्मान या गोष्टी जनसामान्यांच्या हितापेक्षा दुय्यम मानणाऱ्या शंकरराव यांनी महाराष्ट्रात व विशेषकरुन मराठवाड्याच्या सिंचनक्षेत्र विकासावर भर दिला होता. (मराठवाडा विभागासाठी जायकवाडी प्रकल्प, नाथसागर निर्माण करुन तंत्रज्ञानावर त्यांनी मात केली. )

शंकरराव चव्हाणाचे संपुर्ण चरित्र म्हणजे महाष्ट्राच्या पाटबंधारे क्षेत्राचा विकास आणि महाराष्ट्राच्या सिंचन योजनांचा इतिहास म्हणजे शंकरराव चव्हाणांचे चरित्र होय, असे म्हटले जाते ते वास्तविक ठरते. १मे १९६० रोजी मराठी भाषीकांचे संयुक्त महाराष्ट्र उदयास आले, यात मराठवाडा बिनशर्त सामील झाला. नव्याने स्थापन झालेल्या संयुक्त महाराष्ट्राच्या मंत्रीमंडळामध्ये शंकरराव चव्हाण यांच्याकडे पाटबंधारे खाते आले. संयुक्त महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये शेतकरी हा केंद्रबिंदू असल्याने शंकररावांनी देशाच्या तुलनेतील ४० टक्के धरणे महाराष्ट्रात निर्माण केली. शंकररावांनी तब्बल बारा वर्षे महाराष्ट्राचे पाटबंधारे मंत्री म्हणून काम पाहिले. एव्हढेच नव्हे तर दुसऱ्यांदा मुख्यमंत्री झाल्यावर पाटबंधारे विभागाचा (खात्याचा) कारभार स्वत:कडे ठेवला. पाटबंधारे खात्याचे मंत्री असतांना शंकरराव चव्हाण यांनी महाराष्ट्रातील सर्व नद्यांच्या खोऱ्यांचा जलसिंचनांच्या अंगाने विचार करुन, एखाद्या पाटबांधारे क्षेत्रातील संशोधक (तज्ञास) अभ्यासकास शोभेल असा सखोल तांत्रिक अभ्यास केला होता.

याचे दाखले महाराष्ट्राचे शिल्पकार शंकरराव चव्हाण यात डॉ. सुरेश सावंत यांनी लिहीलेल्या चरित्रामध्ये मिळतात.शंकरराव चव्हाण हे अतिशय कडक शिस्तीचे असल्याने त्यांना महाराष्ट्रातील राजकारण्यांनी हेडमास्तर ही उपाधी दिली होती.

महाराष्ट्राच्या पाटबंधारे विभागाचे जे दोन विभाग कल्पीले जातात. पहिला कृष्णा खोऱ्याचा आणि दुसरा गोदावरीच्या खोऱ्याचा. यातील गोदावरी खोऱ्याचा विकास करायचा असले तर गोदावरी नदीवर मोठे धरण बांधणे गरजेचे आहे. हा विचार शंकररावांनी फक्त मांडलाच नाही तर तो पुढील काळात वास्तवात उतरविला. मराठवाड्याचा आर्थिक व तदअनुषंगीक अंगाने विकास करावयाचा असेल तर या सारख्या कामाची गरज असल्याची भुमिका त्यांची राहिल्याचे दिसते. ही भुमिका प्रत्यक्षात आणण्यासाठी शंकरराव चव्हाणांना आपल्या जिवीतांचा धोका पत्करावा लागल्याचे दाखले मिळतात.

मराठवाड्याच्या सिंचनाच्या दृष्टीने विचार करता जायकवाडी प्रकल्प - नाथसागर निर्माण आणि भूमी व जलव्यावस्थापन संस्था (वाल्मी) या संस्थेची स्थापना या दोघांच्या माध्यमातून जलव्यावस्थापनाला दिलेली चालना हे मराठवाड्यासाठी शंकररावांचे मोठे वरदानच मानावे लागते. शंकरराव चव्हाण यांनी केवळ नदी, धरणेच बांधली असे नव्हे तर अस्तीत्वात असलेल्या प्रकल्पांच्या डागडुगीचे कार्यही हाती घेतले. केवळ मराठवाड्याच्याच विकासाकडे त्यांनी लक्ष केंद्रीत केले होते असही नव्हते तर सन १९७५ पर्यंत विदर्भातील ३०० तलाव व १००० मालगुजरी तलावांची दुरुस्ती त्यांनी करवून घेतली. या कार्यामुळे विदर्भातील लाखो एकर जमिनीला पाणी मिळु शकले. यातून विदर्भातील शेतकऱ्यांची दैन्यवस्था दूर होण्यास मदत झाली.

मागासलेपणाचा कलंक दुर करण्यासाठी जलसिंचन प्रकल्पाचे निर्माण या भागात करणे या बाबत शंकरराव चव्हाणांची आग्रही भुमिका राहिल्याचे दिसते, म्हणून मागास भागांसाठी अनेक पाटबंधारे प्रकल्प त्यांनी हाती घेतले. यात तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत करबंद योजना, गंगापुर स्टेज योजना, कर्णुर योजना, काळ योजना, मालेगाव, भोणी गावगंगा, सामखेडा, भनागर, धिरणी, वांझरे, तुळशी इ. योजना कार्यान्वित करुन राष्ट्रास अर्पण केल्या, याचा उल्लेख करता येतो.

पाण्याशिवाय शेती करणे म्हणजे कधीच न संपणारा व न जिंकणारा जुगार असतो. ही ठाम भुमिका असणाऱ्या शंकरराव चव्हाणांनी आपल्या हयातीत मुख्य भर कृषि विकासावर व त्या अनुषंगाने

येणाऱ्या व आत्यावश्यक ठरणाऱ्या जलसिंचनावर दिल्याचे दिसते. येलदरी धरण, विष्णुपूरी प्रकल्प यांचाही उल्लेख त्यायोगे करता येतो.

**निष्कर्ष:-**

पैठण ही जन्मभूमी, नांदेड कर्मभूमी तर दिल्ली कर्तव्यभूमी अशी ओळख निर्माण करणारे महाराष्ट्रातील एकमेव जनसेवा व देशसेवा करणाऱ्या शंकरराव चव्हाणांच्या पाटबंधारे प्रकल्पाच्या विकासाबाबतीतल्या भूमिकेचे वर्णन करतांना महाराष्ट्राचे शिल्पकार शंकरराव चव्हाण चे लेखक सुरेश सावंत म्हणतात, आपल्या बाळाला ताप आल्यावर एखादी आई जशी बळजबरीने कडू औषध त्याच्या गळी उतरविण्याचा प्रयत्न करते, त्यावेळी आपल्या बाळाचे कल्याण व्हावे अशीच त्या आईची भुमिका असते, काहीशी अशीच भुमिका शंकरराव चव्हाणांनी पाटबंधारे प्रकल्पांच्या बाबतीत घेतली होती.

तात्पर्य शंकरराव चव्हाण यांनी आपल्या कार्यकाळात घेतलेली जलसिंचन भुमिका व विचार महाराष्ट्राच्या एकुनच सिंचन विकासाच्या दृष्टीने महत्वाचे ठरले आहे. त्यांचे सिंचन विषयक कार्य ही महाराष्ट्रातील सर्वागींण विकासासाठी मोठी देणगी ठरली असल्याचे दिसते.

**संदर्भ :**

१) मायबोलीचा मराठवाडा खंड -२ (तोला मोलाचा मराठवाडा), संपा. श्रीराम पाटील, योगेश प्रकाशन औरंगाबाद, १० फेब्रु- २००४ पृ. १९०.
२) आठवणीतले शंकरराव चव्हाण - प्राचार्य टी.व्ही. कोळीकर, प्रथमावृत्ती (१४ जुलै २०१०) संगत प्रकाशन, नांदेड २०१०.
३) महाराष्ट्राचे शिल्पकार - शंकरराव चव्हाण, डॉ. सुरेश सावंत, द्वितीयावृत्ती, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, ऑगस्ट २०१०.
४) शंकरराव चव्हाण जीवन व कार्य डॉ. उत्तम सावंत, प्रथमावृत्ती, निर्मल प्रकाशन, नांदेड, १६ जानेवारी २०००.
५) शंकरराव चव्हाण ते पृथ्वीराज चव्हाण, डॉ. विश्वास मेहेंदळे, चौथी सुधारीत आवृत्ती, अनुबंध प्रकाशन, पुणे, १०ऑगस्ट २०१२ .
६) दै. आनंद नगरी, शुक्रवार १४ जुलै २०१७, संपादकीय, पान क्र.४